# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३**

## गृह विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४६**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: बी-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५५, पोलीस**<br>**रूपये:- ४,७८,३४,२३,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१) | ४९३७ | १० | मलकापूर विधानसभा मतदार संघातील पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्या अधिपत्याखालील येत असलेले मलकापूर शहर पोलीस स्टेशन इमारत व शासकीय निवासस्थानाचे बांधकाम व नांदुरा शहर पोलीस स्टेशन येथील इमारतचे बांधकाम हे फार वर्षापूर्वीचे असल्याने अतिशय शिकस्त झालेली असणे,पोलीसांच्या शासकिय निवासस्थानाची फार मोठया प्रमाणात पडझड झालेली असणे, त्यामुळे शासकीय निवासस्थानाचा वापर करणे धोकादायक असणे. तसेच बुलडाणा जिल्हा पोलीस दलात पोलीस भरती प्रक्रियेमध्ये निवड झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रात्याक्षिक प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर पोलीस स्टेशन मध्ये वितरीत केले जातात त्यामुळे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या संख्येत वाढ होत असुन तेथील प्रशासकीय इमारत व निवासस्थाने आज ज्या परिस्थितीत आहेत त्या परिस्थितीत वापरण्यायोग्य नसने, त्यामुळे पोलीस स्टेशन अंतर्गत प्रशासकीय इमारती व शासकीय निवासस्थाने तसेच बॅरेक बांधकामाची आवश्यकता असणे, पोलीस स्टेशन नांदुरा शहर करीता नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम मंजुर करण्यात यावे, याची सतत मागणी होत तरी ती मंजुर करण्यात यावी करीता तातडीने करावयाची कायवाही. |
| (२) | ४९४४ | १० | दि मलकापूर अर्बन बँकेच्या भ्रष्टाचार प्रकरणी मनतकार दांपत्यावर आरोप झाल्याने दांपत्य व्यथीत होणे,अविनाश मनतकार व नयना मनतकर हे दांपत्य सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असल्यामुळे समाजामध्ये त्यांची प्रतिष्ठा असणे, मनतकार दांपत्यांनी न्यायालयीन कामकाजकरिता नागपूर येथे जाणे, नागपूर येथे श्री मनतकार बेपत्ता असल्याचे श्रीमती मनतकार यांच्या लक्षात येणे, शोधा शोध सुरू असताना श्री मनतकार यांचा मृतदेह अजनी (नागपूर) येथील रेल्वे रुळावर सापडणे, श्री मनतकार यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास येणे, आत्महत्ये च्यापूर्वी चिठ्ठी लिहून त्यामध्ये मलकापूर अर्बनचे अध्यक्ष चैनसुख संचेती व उपाध्यक्ष लखानी यांनी स्वतः भ्रष्टाचार करून मनतकार दाम्पत्यांना त्यामध्ये फसविल्याचे व मलकापूर अर्बनची संचालकांनी दिलेल्या त्रासामुळे आत्महत्या करीत असल्याचे सुसाईड नोट मध्ये लिहून ठेवलेले असणे, लोकप्रतनिधीं यानात्याने बँकेच्या संचालक मंडळाच्या भ्रष्टाचाराबाबत मागील काळात वारंवार तक्रारी केलेल्या असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. शिरीष चौधरी** |
| (३) | ४९३५ | १० | रावेर (जि जळगाव ) येथील पोलीस वसाहत ब्रिटीशकालीन असून सन १९११-१२ या वर्षी बांधण्यात आलेली असून सदर या निवासस्थानांना सुमारे १०५ वर्षे झालेली असून ती अतिशय जिर्ण झालेली असणे, सदर पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांचे निवासस्थान बांधकामाचा प्रस्ताव आपल्या विभागाकडे सादर केलेला असून रावेर येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे नवीन निवासस्थान बांधकामासाठी तरतूद करणे आवश्यक असताना याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही करावयाची उपाययोजना. |
| (४) | ४९३८ | १० | फैजपूर (ता. रावेर, जि जळगाव ) येथील पोलीस वसाहत 40 वर्षापासून असून या ठिकाणी असणाऱ्या रस्ते व नाले रस्ते, पथदिवे व सुरक्षा भिंत यांची सोय नसल्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटुंबांना व वयोवृध्द नागरिकांना याठिकाणी येणे जाणे अत्यंत गैरसोयीचे होत असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत तातडीने लक्ष घालून करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. चेतन तुपे** |
| (५) | ४८९१ | १० | राज्यात विशेषता पुणे शहरात महिलांवरील अत्याचारांच्या प्रकारांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, त्यामुळे महिलांमध्ये निर्माण झालेले भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण, परिणामी निर्माण झालेला असंतोष,अशा प्रकारच्या वाढत्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ४८९४ | १० | राज्यभरात पत्रकारांवर हल्ले होण्याच्या प्रकारात झालेली वाढ,अंगावर वाहन घालून पत्रकारांना जीवे मारण्याचे घडणारे प्रकार,त्यामुळे पत्रकारात निर्माण झालेली असंतोषाची आणि असुरक्षिततेची भावना,या प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ४८९६ | १० | हडपसर(पुणे)विधानसभा मतदारसंघातील मुंढवा पोलीस स्टेशनच्या इमारतीसाठी उपलब्ध जागेवर पोलीस स्टेशनच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता शासनाचे करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ४८९७ | १० | हडपसर(पुणे) विधानसभा मतदारसंघातील काळेपडळ आणि फुरसुंगी येथे मंजूर झालेल्या नवीन पोलीस स्टेशन्सची प्रत्यक्ष स्थापना करण्याच्या कमी होत असलेला विलंब,कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ही पोलीस स्टेशन्स तातडीने स्थापन करून कार्यान्वित करण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ४९०१ | १० | हडपसर(पुणे) विधानसभा मतदारसंघातील हडपसर सर्वे नंबर 165 येथे पोलीस विभागाची विविध कार्यालये उभारण्यासाठी उपलब्ध असलेल्या जागेवर संकुल बांधण्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. संग्राम थोपटे** |
| (१०) | ४९२३ | १० | पुणे जिल्हयातील भोर तालुक्यातील भोर पोलिस स्टेशन येथील पोलिस कर्मचारी वसाहत असून ती अतिशय जुनी व जीर्ण झाली असून राहण्यास धोकादायक आहे. तसेच सदर इमारत पावसाळयात गळत असून कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची राहण्याची गैरसोय होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ४९२४ | १० | पुणे जिल्हयातील भोर तालुक्यातील राजगड पोलिस स्टेशन, नसरापूर येथील पोलीस स्टेशनची इमारत ही अत्यंत जुनी व जीर्ण असून पावसाळयात पावसाचे पाणी गळत असल्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांना दैनंदिन कामकाज करणे, अवघड व अशक्यप्राय होत आहे, सदरच्या पोलीस स्टेशनला रा.प.महामंडळाची मौजे नसरापूर,ता.भोर, जि.पुणे येथील विनावापर जागा बदलीने हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. त्याचप्रमाणे सदर अधिकारी व कर्मचारी थांबा निवासस्थानाची इमारत बांधकामे अत्यंत आवश्यकता असणे, यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ४९२६ | १० | पुणे जिल्हयातील वेल्हे तालुक्यातील वेल्हे पोलीस स्टेशन मधील अधिकारी व कर्मचारी यांना राहण्यासाठी अद्याप पोलीस वसाहत नाही, त्यामुळे सदर कर्मचारी अधिकारी यांना मुख्यालयी थांबणे अत्यंत अवघड जाणे, त्यामुळे त्यांच्या राहण्यासाठी निवासस्थानाची इमारत बांधणे अत्यंत आवश्यक आहे. |
| (१३) | ४९२७ | १० | पुणे जिल्हयातील मुळशी तालुक्यातील पोलीस स्टेशन पौड, येथील पोलीस स्टेशनचे कार्यालय तहसिल कार्यालय, पौड यांच्या मालकीच्या जागेत कार्यरत असून सदर ठिकाणी नवीन पोलीस स्टेशनची इमारत बांधणे आवश्यक असून कर्मचारी व अधिकारी यांनाही राहण्यासाठी शासकीय निवासस्थान बांधणे आवश्यक आहे. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१४) | ४८५९ | १० | भंडारा जिल्हयातील साकोली तालुक्यातील पोलिस अधिकारी व कर्मचा-यांकरिता स्वतंत्र निवासासाठी ईमारतीची सोय नसणे, पोलिस चौकी येथील कर्मचा-यांच्या निवासाची व्यवस्था नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (१५) | ४८६० | १० | भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांकरिता स्वतंत्र निवासासाठी इमारतीची सोय नसणे, येथील कर्मचा-यांना निवासाकरीता स्वतंत्र इमारत नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |
| (१६) | ४८६१ | १० | भंडारा जिल्हयातील लाखांदूर तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचा-याकरिता स्वतंत्र निवासासाठी इमारतीची सोय नसणे, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. अजित पवार** |
| (१७) | ४९४२ | १० | “रत्नागिरी जिल्ह्यातील बरसू येथील प्रस्तावित रिफायनरी साठी स्थानिक रहिवाशांचा विरोध असणे, सदर विरोधातून स्थानिक पत्रकार शशिकांत वारीशे याची भूमाफिया पंढरीनाथ आंबेरकर यांनी हत्या केल्याचा आरोप होत असणे, आंबेरकर याने बरसू मधील शेतकऱ्यांना धमकावून कमी दरामध्ये जमिनी खरेदी करण्याचा सपाटा लावलेला असणे, आंबेरकर यांनी खरेदी केलेल्या जमिनींच्या सातबारावर भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते लाभार्थी असणे, यामध्ये भाजपा तालुका उपाध्यक्ष, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष आदी पदांवरील कार्यकर्त्यांचा समावेश असणे, या सर्व प्रकाराला स्थानिक मंत्र्यांकडून पाठिंबा मिळत असणे, या संदर्भात सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जमिनी बळकावल्या प्रकरणाची चौकशीची होत असलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| (१८) | ४९४३ | १० | “खाजगी सावकारांच्या जाचाला कंटाळून नाशिक जिल्ह्यातील सातपूर परिसरात राहणाऱ्या पिता व दोन मुलांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात उघडकीस आली असणे, सदर घटना घडल्याच्या पार्श्वभूमीवर अवैध सावकारी करणाऱ्या 21 सावकारांच्या विरोधात नाशिक जिल्ह्यात गुन्हे दाखल झालेले असणे, तथापि राज्यातील अवैध सावकारांच्या विरोधात एक विशेष मोहीम घेऊन कारवाई करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| (१९) | ४९४६ | १० | “दादर पोलीस ठाण्यात माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या गोळीबारात बंदुकीतून सुटलेली गोळी आणि बंदूक सत्ताधारी पक्षाचे आमदार सदा सरवणकर यांच्या बंदुकीतूनच सुटल्याची बाब बॅलेस्टिक अहवालातून उघड झालेली असताना या संदर्भात गृह विभागाने पुढे कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यामुळे राज्यातील जनतेत शासनाबद्दल पसरलेली नाराजीची भावना या संदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |
| (२०) | ४९४७ | १० | “सन २०२२ मध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ८३ शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या विरोधात तर सन २०२१ मध्ये ८८ अधिकारी कर्मचाऱ्यांच्या विरोधात कारवाई केलेली असली तरी संबंधित सरकारी अधिकारी कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झाल्याचे आढळून येत नसणे,यासंदर्भात अटक करण्यात आलेली असतानाही निलंबनाची कारवाई न करणाऱ्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांवर व लाचलुचपत गुन्ह्यात असलेल्या आरोपींवर निलंबनाची कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच आरोपींची मालमत्ता गोठविण्यास शासनास आलेले अपयश, राज्यभरातील 179 लाचखोर निलंबित न होता अद्यापही कर्तव्यावर हजर असणे तर दुसरीकडे सात प्रकरणात लाचखोरांची सहा कोटींहून अधिकची मालमत्ता गोठविण्यासाठीचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना” |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२१) | ४९५५ | १० | "एखाद्या शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी राज्य शासनाची मंत्रालयातून मंजुरी आवश्यक असणे, तथापि फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाने मंत्रालयातील अधिकारी स्वतःला कायद्यापेक्षा मोठे समजतात काय अशा प्रकारचे ताशेरे ओढून पंधरा दिवसांच्या आत शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिलेले असणे, लाचखोर तहसीलदाराच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यास मंजुरी देण्याबाबत पुनर्विचार करून निर्णय घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले असणे, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्गाचे तहसीलदार रवींद्र बारस्कर यांनी लाच मागितली अशी तक्रार विशाल परब यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे केली असताना, दूरध्वनीवरील संभाषण रेकॉर्ड केले असताना, बारस्कर यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी सरकारकडे परवानगी मागितलेली असताना व ठोस पुरावे असूनही सरकारने परवानगी नाकारलेली असणे, यासंदर्भात अशा अनेक प्रकरणात शासनाची मंजुरी प्रलंबित असल्यामुळे राज्यातील जनतेत मोठ्या प्रमाणात पसरलेली नाराजी, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना" |
| (२२) | ४९५७ | १० | "राज्य शासनासमोर विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची चनचन असताना एकट्या नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत गेल्या वर्षात ई-चलनाद्वारे कारवाई करण्यात आलेल्या तब्बल ५ लाख ८ हजार ९३९ वाहनांकडे तब्बल ४४ कोटी ७० लाख रुपयांच्या दंडाची रक्कम थकीत असल्याचे आढळून आलेले असणे, यासंदर्भात संपूर्ण राज्यातील अशा प्रकारच्या दंडाची रक्कम मोठी असण्याची शक्यता, तरी सदर नियम मोडणाऱ्या वाहनधारकांकडून तातडीने दंड वसूल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना." |
| (२३) | ४९५८ | १० | "ठाणे महानगरपालिकेतील भ्रष्टाचाराविरोधात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तात्कालीन केंद्रीय नगर विकास विभागाच्या मंत्र्यांची भेट घेऊन स्मार्ट सिटी निधीतील भ्रष्टाचाराची तक्रार केलेली असणे, सदरहू भ्रष्टाचाराची पोलीस खात्याकडून चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी ठाणे शहरातील जनतेमध्ये पसरलेली नाराजीची भावना, या संदर्भात शासनाने तातडीणे करावयाची कार्यवाही व उपाययोजना" |
| (२४) | ४९५९ | १० | "मुंबई पोलिसांनी ई-सिगारेटच्या विरोधात विशेष मोहीम हाती घेण्याची आवश्यकता, यासंदर्भात पोलिसांनी प्रसिद्ध मुच्छड पानवाला सह इतर किरकोळ चार-पाच दुकानदारांच्या विरोधात कारवाई केल्याचे निदर्शनास येणे, तथापी ई- सिगारेट तरुणाईला आपल्या ताब्यात घेत असताना, खुलेआम ही सिगरेट उपलब्ध होत असल्यामुळे राज्यातील पालक आणि सुजाण नागरिकांमध्ये पसरलेले संतापाचे वातावरण, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना" |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (२५) | ४८६२ | १०० | जळगाव जिल्ह्यातील अमळनेर शहराची व तालुक्याची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून साडेतीन लाख लोकसंख्येसाठी केवळ दोनच ब्रिटिशकालीन पोलीस ठाणे अस्तित्वात असणे, त्यामुळे संपूर्ण शहरासह ग्रामीण भागातील 93 गावांकडे लक्ष देणे पोलिसांना जीकीरीचे होत असणे, अमळनेर शहर व तालुक्यात गुन्ह्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अमळनेर शहरासाठी स्वतंत्र शहर पोलीस ठाणे निर्माण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करण्यास 2013 मध्ये गृह विभागाने तत्वतः मंजुरी दिलेले असणे, अमळनेर नगरपालिकेने पोलीस ठाण्यासाठी स्वतंत्र सेंट्रल स्कूल इमारतीचे जागा सुद्धा उपलब्ध करून दिलेली असणे, मात्र याबाबतचे कार्यवाही शासन स्तरावरून प्रलंबित असणे त्यामुळे सदर पोलीस स्टेशन मंजुरी देण्याबाबत शासनाने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | ४८६३ | १०० | महाराष्ट्र राज्य पोलीस खात्यात राज्यभरात जिल्हा निहाय बँड पथके कार्यरत असणे, तसेच राज्य राखीव पोलीस दलाची 19 बँड पथके व रेल्वे पोलीस दलाचे 4 बँड पथके असणे, मात्र बँड्समनची 1480 पदे रिक्त असून गेल्या अनेक वर्ष पात्रता असूनही अनेक उमेदवार या पदांची जाहिरात निघण्याची प्रतीक्षा करत असणे, जाहिराती अभावी आता त्यांना संधी मिळणार की नाही अशी शक्यता निर्माण झाली असणे, यासाठी दोन उमेदवारांनी औरंगाबाद उच्च न्यायालयात याचिका सुद्धा दाखल केली असणे, सदरील पदे भरण्याबबत शासनाने करवायची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | ४९९९ | १०० | जळगांव जिल्ह्यातील मुक्ताईनगर, बोदवड, सावदा येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची झालेली दुरावस्था 50-60 वर्षांपूर्वी बांधलेली कौलारु घरे पडण्याची निर्माण झालेली परिस्थिती तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांची लहान व पडक्या घरात राहणे शक्य नसणे, घरे पडून जिवितहानी होण्याची शक्यता ठिकाणी कर्मचारी संख्येनुसार निवास स्थाने बांधकाम करण्याची आवश्यकता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (२८) | ४९११ | १० | पदोन्नत्यांसाठी पात्र ठरल्यानंतरही पदोन्नत्या होत नसल्यामुळे राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला असणे, पोलीस महासंचालक कार्यालय आणि मंत्रालयातील समन्वयाच्या अभावाचा फटका राज्यातील पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षकांसह ‘आयपीएस’ दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांनाही सहन करावा लागत असणे, पोलीस उपनिरीक्षकांच्या १११ व्या तुकडीतील २०० अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली असली तरी त्याच तुकडीतील जवळपास ३०० उपनिरीक्षकांना ९ वर्षांचा कालावधी उलटल्यानंतरही पदोन्नती देण्यात आलेली नसणे, तसेच ११२ तुकडीतील अधिकारीसुद्धा पदोन्नतीची वाट पाहत असणे, १०२ आणि १०३ तुकडीतील सहायक पोलीस निरीक्षकांना पदोन्नती देण्यासाठी पोलीस महासंचालक कार्यालयाने गेल्या ४ महिन्यांपूर्वीच माहिती मागितली असणे, अधिकाऱ्यांनी सर्व माहिती तातडीने पाठविल्यानंतरही अद्यापर्यंत पदोन्नतीसंदर्भात कोणतीही हालचाल झालेली नसणे, १०४ ते १०८ तुकडीतील काही कनिष्ठ अधिकारी न्यायालयात गेल्याचे कारण सांगून १०३ तुकडीला पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात येत असणे, सन २०१३ साली पोलीस उपनिरीक्षक पात्रता परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या ५२० हवालदारांची पदोन्नतीसाठी निवड करूनही सहा महिन्यांपासून त्यांना पदोन्नती आदेशापासून वंचित ठेवण्यात आल्याची बाब समोर आलेली असणे, पोलीस निरीक्षकही काही महिन्यांपासून पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२९) | ४९१७ | १० | नाशिक जिल्ह्यातील लासलगाव (ता.निफाड) पोलीस ठाण्याची वाढलेली लोकसंख्या, मोठे क्षेत्रफळ इत्यादी बाबींमुळे लासलगाव पोलीस ठाण्यावर कामाचा प्रचंड ताण पडत असणे, त्यामुळे लासलगाव पोलीस ठाण्यातील कामांच्या व्याप्तीचा विचार करून हे पोलीस स्टेशन सहायक पोलीस निरीक्षक ऐवजी पोलीस निरीक्षक असे उन्नत करण्याची लोकप्रतिनिधी यांनी दि. २ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | ४९२१ | १० | येवला (जि.नाशिक) प्रशासकीय संकुलामध्ये येवला तालुका पोलीस स्टेशन कार्यरत असणे, सदर तालुका पोलीस स्टेशनची इमारत अपुरी पडत असणे, त्यामुळे अस्तित्वातील इमारतीवर पहिल्या माळयाचे बांधकाम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंडळ नाशिक यांनी दि. २२/१०/२०२२ अन्वये रक्कम रु. १९८.०८ लक्षचे अंदाजपत्रकासह शासनास प्रस्ताव सादर केलेला असणे, येवला तालुका पोलीस स्टेशन विस्तारीत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी दि. ७ डिसेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | ४९२५ | १० | लासलगाव, ता.निफाड, जि.नाशिक पोलीस ठाणे येथील कर्मचारी निवासाचे बांधकाम करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. २१ ऑक्टोबर २०२२ रोजी शासनाकडे मागणी केलेली असणे, लासलगांव येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासाची कमतरता असणे, येथील पोलिसांच्या निवास व्यवस्थेची अडचण लक्षात घेऊन सदर ठिकाणी पोलीस अधिकारी-कर्मचारी निवासांच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३२) | ४९२८ | १० | पोलीस आयुक्तालयातील सातपूर व अंबड पोलीस ठाण्याचे विभाजन करून नवीन चुंचाळे पोलिस ठाणे निर्माण करण्यासाठी पोलिस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी दि. ४ डिसेंबर २०१८ अन्वये शासनाला प्रस्ताव पाठविलेला असणे, अंबड व सातपूर पोलीस स्टेशनचे क्षेत्रफळ, लोकसंख्या गुन्ह्यांची संख्या आणि मर्मस्थळे या सर्वांचा विचार करून या दोन्ही पोलिस ठाण्याचे तातडीने विभाजन करण्याची नितांत आवश्यकता असणे, नवीन निर्माण करावयाच्या पोलिस ठाण्याला "एमआयडीसी पोलीस ठाणे" हे नाव देण्याची मागणी असणे, पोलीस ठाण्याच्या मंजुरीनंतर एमआयडीसीच्या सहकार्याने पायाभूत सुविधा निर्माण करून हे पोलीस ठाणे कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित असणे, नाशिक शहरातील सातपूर व अंबड पोलिस ठाण्याचे विभाजन करून नवीन "एमआयडीसी पोलीस ठाणे " निर्माण करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १८ सप्टेंबर २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (३३) | ४९१६ | १०० | बीड जिल्ह्यात मागील सहा ते आठ महिन्यांच्या काळात सातत्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असणे, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या सुरक्षेच्या निर्माण झालेल्या प्रश्नांवरून महिलांनी सरकार विरोधात मोर्चा काढलेला असणे, बीड जिल्हा पोलीस दलात एकूण 16 पोलीस निरीक्षक पदाची पदे रिक्त असून यामुळे पोलीस |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | यंत्रणेवर वाढलेला ताण व त्या जागा भरण्याची मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३४) | ४९१८ | १०० | बीड जिल्ह्यात मागील सहा ते आठ महिन्यांच्या काळात सातत्याने गुन्हेगारीचे प्रमाण वाढलेले असणे, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या सुरक्षेच्या निर्माण झालेल्या प्रश्नांवरून महिलांनी सरकार विरोधात मोर्चा काढलेला असणे, बीड जिल्हा पोलीस दलात 3 उपविभागीय पोलीस अधिकारी पदाची पदे रिक्त असून यामुळे पोलीस यंत्रणेवर वाढलेला ताण व त्या जागा भरण्याची मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३५) | ४९१९ | १०० | परळी तालुक्यातील धर्मापुरी हे मोठे गाव, बाजारपेठ व तीन राष्ट्रीय महामार्गांना जोडले गेलेले मोठ्या लोकसंख्येचे गाव असणे, या गावात निजामकालीन किल्ला अस्तित्वात असून या किल्ल्याच्या संवर्धनासाह धर्मापुरी गाव व परिसरातील गावांमध्ये शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित असणे बाबत याठिकाणी स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्याची आवश्यकता असणे व त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३६) | ४८६६ | १० | भुसावळ, जि.जळगांव येथील अवैध धंदे करणाऱ्यांची संख्या मोठयाप्रमाणात असणे, शहरातील दोन भागामध्ये काही सामाजिक व राजकीय पदाधिकारी यांचा समावेश असणे, त्यामुळे शहरातील कायदा सुव्यवस्थांचा प्रश्न निर्माण होणे, अवैध धंदे व्यापरी शहर लगत भागात मोबाईल वर हे करत असणे, तरी हे अवैध धंदे बंद करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३७) | ४८६७ | १० | नवी मुंबई शहरात बेलापूर विधानसभा क्षेत्रामध्ये पोलिसांची निवासस्थाने असणे, पोलिसांची घरे अत्यंत जीर्ण झाली असून मोडकळीस आली असणे, पोलिसांचे कुटूंबिय त्याठिकाणी जीव मुठीत घेऊन रहात असणे, सदरच्या घरांचा पुनर्विकास करण्याता यावा, असे निदेश शासनाने सिडकोला दिले असणे, तथापि सिडको त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, पुनर्बांधणी संदर्भात कोणतीच कार्यवाही होत नसणे, परिणामी पोलिसांमध्ये व त्याच्या कुटूंबियांमध्ये भिती निर्माण झाली असणे, त्याचप्रमाणे त्यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला असणे, त्याचप्रमाणे शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (३८) | ४८६८ | १० | ठाणे शहर व परिसरात विविध ठिकाणी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची निवासस्थाने असणे, १०६४ निवासस्थाने असणे, सदरच्या चाळी व इमारती अनुक्रमे १९३९, सन १९५७, १९८२ व २०१२ मध्ये निवासस्थाने बांधली असणे, सदरची निवासस्थाने जीर्ण झाली असणे, अनेक इमारती धोकादायक झाल्या असणे, ठाणे शहर व वर्तक नगर पोलिस वसाहतीमध्ये सोयी सुविधांचा अभाव असणे, पोलिस कुटूंबियांना अडचणीचा सामना करावा लागत असणे, इमारत कोसळून जीवन हानी होण्याची शक्यता नाकारता येत नसणे, पोलिस जनतेच्या रक्षणासाठी अहोरात्र राबत असणाऱ्या पोलिस अधिकारी व कुटूंबियाच्या डोक्यावर सुरक्षीत छप्पर नसणे, पोलिस |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अधिकारी/कर्मचारी यांना सर्व सोयीसुवधिासह घरे देण्यासंदर्भात शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी पोलिस अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटूंबियामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (३९) | ४८७१ | १० | कारंजा,जि.वाशिम येथे मोठया प्रमाणात सट्टा, मटका व भिंगरी तसेच अवैध गुटखा या मोठयाप्रमाणात सुरु असणे, याबाबी वारंवार पोलिस प्रशासनाकडे तक्रार करुनसुध्दा कोणतीही कार्यवाही न होणे, या प्रकरणी पोलीस निरीक्षकसह गुन्हे विभागात कार्यरत असलेले कर्मचारांचा सहभाग असणे, तरी या शहररातील व तालुक्यातील अवैध धंदे बंद करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४०) | ४९७२ | १० | मुंबई उपनगरातील मालाड (प.) मालवणी, अंबोजवाडी, खारोडा, मढ, आक्सा या ठिकाणी ड्रग्ज, एम.डी. व इतर नशा करीत असणे, ड्रग्जचा सुळसुळात निर्माण झाला असणे, अवैधपणे विकत असणे, संबंधित पोलिस अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| | | | **श्री. रईस शेख** |
| (४१) | ४९३६ | १०० | नारपोली पोलिस स्टेशनच्या भिवंडी हद्दीतील मौजे-दिवे (अंजुर) व गुंदवली गांव, ता. भिवंडी येथील सर्व्हे क्र. ४२ व सर्व्हे क्रं. ३९ या जमिन मिळकतीमध्ये तेथील इंडियन कॉर्पोरेशनचे विकासक रुद्रप्रताप त्रिपाठी यांनी हरक्या विठु म्हात्रे हे सन १९८९ साली मयत असतांना त्यांची सन २००८ साली बनावट कुलमुखत्यारपत्र बनवुन त्यांनी जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडुन बिनशेती आदेश प्राप्त करुन घेतले आणि सदर जमिन परस्पर तिऱ्हाईत इसमास विक्री केली, म्हणुन भालचंद्र बाळाराम म्हात्रे यांनी स्थानिक पोलिस स्टेशनला कलम १५६ (३) न्यायालयीन आदेश प्रमाणे गुन्हा रजिस्टर ८०/०९ दि. १४/३/२००९ भा.द.वि. कलम ४२० प्रमाणे गुन्हा नोंदविला असुन आरोपी रुद्रप्रताप त्रिपाठी यांनी समजोता करुन भालचंद्र बाळाराम म्हात्रे यांना १२००० स्क्वेअरफिटचे वेअरहाऊस देतो असे करारपत्र लिहुन दिलेले असतांना व त्याचे भाडे चालु केले असतांना तत्पश्चात भालचंद्र म्हात्रे मयत झाल्याचा गैरफायदा घेऊन आरोपी रुद्रप्रताप त्रिपाठी यांनी भालचंद्र यांच्या विधवा पत्नी मनिषा भालचंद्र म्हात्रे यांना यांचे भाडे बुडवुन त्यांना कराराप्रमाणे वेअरहाऊस गोडाऊन न देता त्यांची जमिन हडपुन त्यांना देशोधडीला लावुन उपासमारीची वेळ आणलेली आहे. तरी स्थानिक पोलिस स्टेशनला जो गुन्हा दाखल झालेला आहे विधवा महिला यांना न्याय मिळण्यासाठी नागरी हक्क संरक्षण कायदयांतर्गत आरोपी विकासक यांच्यावरती कठोर कार्रवाई करुन त्यांची दडपशाहिने हडपण्यात आलेली जमिन व त्यांनी बळकावलेली जमिन मनिषा म्हात्रे यांना परत मिळण्यासाठी शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४२) | ४९३९ | १०० | शांतीनगर पोलिस स्टेशन भिवंडी येथील तहसिलदार यांनी दिलेल्या हुकूम आदेशाला निवासी नायब तहसिलदार यांचे बनावट आदेश तयार करून अधिकार प्राप्त नसलेल्या नायब तहसिलदार यांचे नाव महसुल रेकॉर्ड दप्तरी आढळ होत नाही, बनावट आदेशाने तलाठी यांनी बनावटरीत्या फेरफार नोंदवून मंडळ अधिकाऱ्यांमार्फत सातबारा मंजुर करुन संरक्षित कुळ लक्ष्मी टावरे यांचे नांव सातबाऱ्यावरून कमी करण्यात आले अपंग महिला लक्ष्मी टावरे यांनी शांतीनगर पोलिस स्टेशन भिवडी या ठिकाणी नोव्हेंबर महिन्यात तक्रार दाखल केली असून तपास अधिकारीकडे ठोस पुरावे सादर करुनही व सरकारी साक्षीदारानी सदर फेरफारावरील सही खोटी असल्याची कबुली देऊनही तपासास विनाकारण विलंब होत आहे तात्कालीन तलाठी व तात्कालीन मंडळ अधिकारी यांनी सदर प्रकरणावरती त्यांची सही नसल्याचे फेरफार बनावटरील्या खोटी सही करुन नोंद मंजुर केल्याचे कबुल केले आहे त्यामुळे सदर बनावट कागदपत्रे प्रकार हा विकासक यांनी केल्याचे दिसून येत असल्याने त्यांच्याविरुध्द पोलिस स्टेशन मार्फत कुठलीही कार्रवाई होत नसल्यामुळे अपंग महिलेस त्यांचे जमिन परत मिळवून देणेकामीस शासनाने गांभीर्याने दखल घेऊन संबंधित आरोपींवरती तुर्त गुन्हा दाखल करणेकामी शासनाने करावयाची कार्रवाई. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५५ , मार्ग व परिवहन**<br>**रूपये:- १९,५३,००,००,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे** |
| (४३) | ४९३० | १० | अंजनगाव सुर्जी शहर मुख्यालयापासून ७० कि मी दूर असणे , येथून ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणात प्रवासी जिल्ह्यातील विविध भागात जात असणे , परंतु अंजनगाव सुर्जी येथील बस स्थानकात आगार नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत असणे , अंजनगाव सुर्जी येथील बस स्थानकात आगार निर्माण करावयाची अनेक वर्षांपासून नितातं मागणी असणे , परंतु याबाबत शासनाने अद्यापही कोणतेही कार्यवाही केलेली नसणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५५, पोलीसावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ६,९१,५५,०१,०००/-**<br>**श्री. दिलीपराव बनकर** |
| (४४) | ४८७९ | १० | पिंपळगाव बसवंत, ता.निफाड, जि.नाशिक या पोलीस स्टेशन व कर्मचारी व अधिकारी निवासस्थाने इमारतीचे बांधकाम हे सन १९६३-६४ मध्ये झालेले असणे. सदरच्या इमारती ह्या मोडकळीस आलेल्या असून इमारतींना मोठ्या प्रमाणात गळती असल्याने या इमारतीचे नव्याने बांधकाम करण्याची असलेली आवश्यकता तसेच मंजूर संख्या बळानुसार ४ अधिकारी निवास, ५५ पोलीस अंमलदार निवासस्थान व १ पोलीस ठाणे इमारतीची आवश्यकता असून प्रत्यक्षात १ अधिकारी निवासस्थान ३६ पोलीस अंमलदार निवासस्थान, १ पोलीस ठाणे इमारत अस्तित्वात असणे. या सर्व इमारती आज रोजी वापरण्यायोग्य नसल्याने पोलीस स्टेशन इमारतीसह अधिकारी व कर्मचारी निवासस्थाने नव्याने बांधण्याची असलेली आवश्यकता याबाबतचा प्रस्ताव शासन |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | दरबारी सन २०२१ पासून प्रलंबित असणे या प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याची असलेली आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **मागणी क्रमांक: बी-१०**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १२,५८,३१,०६,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे** |
| (४५) | ४९३३ | १० | पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी येथील इमारत अतिशय जुनी तसेच ब्रिटिशकालीन असणे , त्याच प्रमाणे पोलीस स्टेशन चिंचोली राहिमापूर ता. अंजनगाव सुर्जी , पोलीस स्टेशन येवदा ता. दर्यापूर , पोलीस स्टेशन खल्लार ता. दर्यापूर येथिल नवीन पोलीस स्टेशन इमारत आणि पोलिसांचे निवासस्थान बांधकामाची मागणी असणे. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांचा राहण्याच्या दृष्टीने ग्रामीण भागातील पोलीस स्टेशन मध्ये निवासाची व्यवस्था नसणे , पोलीस स्टेशन तसेच निवासस्थान बांधकाची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४६) | ४९९४ | १० | अंबोजवाडा, खारोडी, मार्वे रोड, मालाड (प.) मुंबई येथे असून हा विभाग विस्तीर्ण झाला असणे, याठिकाणी विविध गुन्हे होत असणे, तपास करणे अशक्य झाले असणे, या भागासाठी वेगळे पोलिस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता असणे, पोलिस आयुक्त याकडे दुर्लक्ष करीत असणे, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १४ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) गृह विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई